# प्रसनोट

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गुन्हयाचे नाव | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | आरोपीचे नाव हुद्दा वर्ग व कार्यालयाचा पत्ता | :- | १) विकास किसन खडसे वय ५२ वर्षे, (वर्ग ३) भुमापक, नियंत्रक अनधिकृत बांधकाम विभाग, सिडको रायगड भवन, सिबीडी, बेलापूर<br>२) प्रितमसिंग भरतसिंग राजपुत वय ३९ वर्षे, (वर्ग ३) विकास अधिकारी नियंत्रक अनधिकृत बांधकाम विभाग, सिडको रायगड भवन, सिबीडी, बेलापूर, नवी मुंबई<br>३) प्रदिप जगन्नाथ पाटील वय ३५ धंदा वेटरकाम, खाजगी इसम |
| ३ | अपराध घडला तारीख वेळ व ठिकाण | :- | दि. ०७/०६/२०१९ रोजी १२:२१ ते १२:५२ वा चे दरम्यान तसेच दिनांक १०/०६/२०१९ रोजी १६.०१ वाजता सिडको रायगड भवन, सिबीडी, बेलापूर नवी मुंबई |
| ४. | लाचेची पडताळणी दि. | | दि. ०७/०६/२०१९ रोजी |
| ५. | मागणी केलेली रक्कम | :- | रू. १०,००,०००/- रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू ८,००,०००/-स्विकारण्याचे मान्य केले. |
| ६. | स्विकारलेली रक्कम | :- | दिनांक १०/०६/२०१९ रोजी १६.०१ वाजता रू २,५०,०००/- |
| ७. | कारण | :- | यातील तक्रारदार नवीन बांधकाम केलेल्या इमारतीवर सिडको अतिक्रमण विभागाकडुन कारवाई न करण्यासाठी |

यातील तक्रारदार हे ठाणे, नवी मुंबई परिसरात भूखंड विकत घेवून ते विकण्याचा तसेच बांधकाम करुन विकसीत करण्याचा व्यवसाय करतात. तक्रारदार व त्यांचे भागीदार यांनी सन २०१६ साली श्री.तानूबाई नामदेव जगदाळे व श्री.संजय नामदेव जगदाळे यांच्या मालकीचा जगदाळे निवास, ओल्ड हाउस नंबर ७४७, न्यु हाउस नंबर २३६, संत गणु खंडु कुंभार मार्ग, पालांडे निवासच्या मागे, रावाडा गाव नवी मुंबई येथील २,१७८ चौ.फुटाचा गावठाण भुखंड विकसीत करण्यासाठी भागीदारीमध्ये करार करून सदर जागेवर त्यांनी तळमजला व पहिला मजला अ इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

तक्रारदार यांनी केलेल्या इमारतीचे बांधकाम हे अनाधिकृत असल्याचे लोकसेवक श्री. खडसे यांनी तक्रारदार यांना सांगून सदर बांधकावर सिडको विभागाकडुन कारवाई न करण्यासाठी रू १०,००,०००/- लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०७/०६/२०१९ रोजी केलेल्या लाचेच्या सत्यता पडताळणीमध्ये तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक श्री. खडसे यांनी स्वतःसाठी तसेच त्यांचे वरीष्ठ अधिकारी लोकसेवक श्री. राजपूत यांच्याकरीता रू. १०,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ८,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक १०/०६/२०१९ रोजी केलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. राजपूत यांनी लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडुन घेण्याकरीता लोकसवेक श्री. खडसे यांना प्रोत्साहन दिल्याने लोकसेवक श्री. खडसे यांचे सांगणेवरून तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रक्कम रू. २,५०,०००/- सिडको रायगड भवन उपाहारगृहातील वेटर खाजगी इसम श्री. प्रदिप पाटील यांनी पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यास १६.०१ वाजता रंगेहात पकडण्यात आले आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र व श्री. किसन गवळी, अपर पोलीस अधीक्षक, अे.सी.बी., ठाणे परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली नवी मुंबई ॲन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस उप अधिक्षक श्री. रमेश चव्हाण, व पोलीस कर्मचारी यांनी पार पाडली आहे.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे त्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन श्री. रमेश चव्हाण, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी केले आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई
कार्यालय दुरध्वनी क. ०२२ - २७८३३३४४
टोल फ्री क. १०६४
मोबाईल क. ९८७०४८६६९९



रमेश चव्हाण
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई

Scanned by CamScanner